# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्रं. 156/2024 दिनांक : 30.04.2024**

## 1)चोरी :–

**1)देगलुर :–** दिनांक 29.04.2024 रोजी चे 16.00 वा. चे सुमारास, **नविन बसस्थानक देगलुर ता. देगलुर जि. नांदेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्यांची पत्नी हे नविन बसस्थानक देगलुर येथे बसमध्ये चढत असतांना कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे पत्नीचे लेडीज पर्स सहीत ठेवलेले चार तोळे वजनाचे चार अंगठया प्रत्येकी एक तोळयाचे वजनाचे किंमती 50,000/–रू प्रमाणे असा एकुण 2,00,000/–रू चा व नगदी 18,000/–रू असा एकुण 2,18,000/–रू चे ऐवज चोरून नेले. वगैरे **फिर्यादी हणमंत मोतीराम पाटील, वय 80 वर्षे, व्यवसाय शेती रा. आलुर ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 186/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री फड, मो.क्रं. 9130087444** हे करीत आहेत.

**2)मुक्रामाबाद :–** दिनांक 27.04.2024 रोजी चे 08.00 ते दिनांक 28.04.2024 चे 06.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीच्या शेत शिवारात मौ. सांगवी भादेव ता. मुखेड जि. नांदेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे सांगवी (भादेव) शेत गळ क्रं 144 मधील टिनशेड मध्ये ठेवलेले ज्वारी, हरभरा, सोयाबिन, तुर, 3 एचपीची विहीरीवरील मोटार व तुषार पाईप असे सर्व मिळुन एकुण 68,000/–रू चा मुद्येमाल कोणीतरी अज्ञात चोरटयाने टिनशेडचा कडी कोंडा तोडुन चोरून नेला. वगैरे **फिर्यादी बालाजी जनार्धन आगलावे, वय 50 वर्षे, व्यवसाय शेती रा. सांगवी भादेवि ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रामाबाद** गुरनं 79/2024 कलम 379, 461 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री ताहेर मो.क्रं. 9823156052** हे करीत आहेत.

## 2)गंभीर दुखापत :–

**भोकर :–** दिनांक 28.04.2024 रोजी चे 22.00 ते 23.00 वा. चे दरम्यान, **मौ. पांडुर्णा ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस म्हणाले की, तुम्ही डि जे बंद का केला असे म्हणुन आरोपी हा फिर्यादीचे घरात घुसून फिर्यादीस घराबाहेर काढुन शिवीगाळ करून पंचने डोक्यात मारून डोके फोडुन गंभीर दुखापत केली. फिर्यादीचा भाचा व पत्नी भांडण सोडविण्यास आले असता त्या दोघांना शिवीगाळ करून भाचाचे डोक्यात पंचने मारून डोके फोडले व शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी रमेश देवराव राजेमोड, वय 45 वर्षे, व्यवसाय शेती रा. पांडुर्णी ता. भोकर जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरन 124/2024 कलम 326,452,323,,504,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउनि/देवकांबळे, मो.नं.** हे करीत आहेत.

## 4)विवाहीतेचा छळ :–

**1)मुखेड :–** दिनांक 28.06.2012 चे नंतर चार वर्षापासुन ते आज पावेतो, **फिर्यादीचे सासरी मौ. उंब्रज बोरी ता. कंधार व माहेरी व्यंकटेशनरगर मुखेड ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस शेती घेण्यासाठी माहेरहुन पाच लाख रूपये घेऊन ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून उपाशी पोटी ठेवुन शारिरीक व माणसीक छळ केला. तसचे फिर्यादीचे पतीने तु मला फारकत दे नाहीतर तुला खतम करतो असे म्हणुन. जिवे मारण्याची धमकी दिली.वगैरे **फिर्यादी 38 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 141/2024 कलम 498 (अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2223 कदम, मो.क्रं. 8390695468** हे करीत आहेत.

**2)इतवारा :–** दिनांक 19.07.2017 ते दि. 10.04.2024 चे 17.00 वा. चे दरम्यान, **सुलतानपुर कंधार ता. कंधार व रामरहीमनगर नांदेड येथे,** यातील नमुद तिन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस व्यवसायासाठी तुझे माहेरहुन दोन लाख रूपये घेवुन ये म्हणुन लाथाबुक्यानी मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 26 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 114/2024 कलम 498 (अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/802 वाजीद शेख, मो.क्रं. 8975992449** हे करीत आहेत.

## 5)अपघात :–

**धर्माबाद :–** दिनांक 28.04.2024 रोजी चे 18.15 वा. चे सुमारास, **बसस्थानक कॉर्नर धर्माबाद ता. धर्माबाद जि. नांदेड येथे**, यातील **मयत नामे महमद ईस्माईल अब्दुल कादर, वय 52 वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. सिध्दार्थनगर बाळापुर ता. धर्माबाद जि. नांदेड** हे भाजी खरेदी करण्यासाठी भाजीमार्केट येथे सायकलने जात अतसांना यातील आरोपीने आपला ट्रक क्रमांक एचआर 61 ई 4666 चे चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक हयगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन यातील मयताचे सायकलला पाठीमागुन धडक देवुन डोक्यास गंभीर जखमी करून त्याचे मरणास कारणीभुत झाला आहे. वगैरे **फिर्यादी शेख अब्दुल खादर, पि. मोहमद ईस्माईल, वय 36 वर्षे, व्यवसाय मिस्त्री काम रा. सिध्दार्थनगर बाळापुर ह.मु. इंदरम्मा कॉलनी कंदाकुर्ती मंडळ रेजल जि. निझामाबाद (तेलंगाना)** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं. 104/2024 कलम 279, 304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री जाधवर, मो.क्रं. 7020734747** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्रं. 154/2024 दिनांक :30.04.2024**

## नांदेड पोलीस दलातील पोलीस अधिकारी, व पोलीस अंमलदार सेवानिवृत्त...

नांदेड पोलीस दलातील एक पोलीस उप–निरीक्षक, चार श्रेणी पोलीस उपनिरीक्षक व सात पोलीस अंमलदार व एक बिनतारी संदेशचा अंमलदार असे एकुण तेरा जण नियत वयोमानानुसार दिनांक 30.04.2024 रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. **मा. श्रीकृष्ण कोकाटे,** पोलीस अधिक्षक नांदेड यांचे हस्ते आज दिनांक 30/04/2024 रोजी सर्व सेवानिवृत्तांचा पुष्पगुच्छ, शाल श्रीफळ व भेट वस्तु देवुन सत्कार करण्यात आला. सर्व सेवानिवृताना आरोग्यांची काळजी घेवुन सुखी जिवन जगण्याचा सल्ला दिला. सदर कार्यक्रम मंथन हॉल पोलीस अधिक्षक कार्यालय नांदेड येथे पार पडला. सदर सेवानिवृत्त समारंभास. **मा. श्री श्रीकृष्ण कोकाटे** पोलीस अधिक्षक नांदेड, **मा. श्री जगदीश भंडरवार**, प्र. पोलीस उप–अधिक्षक (मु), इतर पोलीस अधिकारी व अंमलदार मोठया संख्येने हजर होते. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन **सपोउपनि श्री विठ्ठल कत्ते**, यांनी केले असुन, **मपोकॉ राखी कसबे**, पोलीस कल्याण यांनी कार्यक्रमाचे आयोजन उत्तम प्रकारे केले आहे.

| अ.क्र. | हुद्दा | सेविनिवृत्त अंमलदाराचे नाव | नेमणुक |
|---|---|---|---|
| 01 | पोउपनि | रमेश शंकरराव खाडे | जी. पी. यु. |
| 02 | श्रेणी पोउपनि | नरायण शेषेराव कांबळे | पोस्टे देगलुर |
| 03 | श्रेणी पोउपनि | राजेश प्रभाकर चौधरी | श्वान पथक नांदेड |
| 04 | श्रेणी पोउपनि | प्रमोद देवराव नासरे | पोस्टे हदगांव |
| 05 | श्रेणी पोउपनि | प्रविण सुधाकरराव पिंपरकर | पो. मु. नांदेड |
| 06 | मसपोउपनि | विजयलक्ष्मी राजेश्वर कुलकर्णी | पो.नि. कक्ष नांदेड |
| 07 | सपोउपनि | गौतम शंकरराव गवारे | पोस्टे मुक्रामाबाद |
| 08 | सपोउपनि | संजीव ज्ञानोबा भगत | पो.मु. नांदेड |
| 09 | सपोउपनि | धोंडीराम शंकरराव केंद्रे | पोस्टे वजिराबाद |
| 10 | सपोउपनि | दिलीप जवळबा चिते | पोस्टे सोनखेड |
| 11 | पोह | नसेर आलखान जब्बारखान पठाण | पो.मु. नांदेड |
| 12 | पोना | टनिलकुमार अमृतराव भद्रे | पो. मु. नांदेड |
| 13 | प्रयंचालक | एस डी सय्यद | बिनतारी संदेश विभाग नांदेड |

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड



# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड  जा.क्रं.  155 / 2024  दिनांक : 30.04.2024**

पोलीस अधीक्षक कार्यालयात " **राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**" यांची जयंती साजरी

30 एप्रिल, 2024 मंगळवार रोजी **"राष्ट्रसंत तुकडोजी महाराज"** या महापुरूषांची जयंती पोलीस अधीक्षक कार्यालयात साजरी करण्यात आली. **मा. श्रीकृष्ण कोकाटे,** पोलीस अधीक्षक नांदेड, यांचे मार्गदर्शनाखाली **मा. श्री जगदीश भंडरवार**, प्र. पोलीस उप–अधीक्षक(मु) यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी **मा. श्री उदय खंडेराय**, पोनि स्थागुशा, **श्री नामदेव रिठठे**, पोनि पोलीस कल्याण, **श्री दशरथ आडे, पोउपनि** स्थागुशा **श्री त्रिलोचनसिंगसाहेल,** पोउपनि पोलीस नियंत्रण कक्ष नांदेड, श्री सुर्यभान कागणे, सपोउपनि, जनसंपर्क कार्यालय पो. अ. कार्यालय नांदेड, तसेच रामप्रसाद खंडेलवाल, पत्रकार, कंथक सुर्यतळ पत्रकार इतर पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार हे मोठया संख्येने उपस्थित राहुन **"राष्ट्रसंत तुकडोजी महाराज"** या महापुरूषास अभिवादन केले. सदर कार्यक्रमाचे आयोजन, **पोहेकॉ / संजय सांगवीकर, पोकॉ / मारोती कांबळे, विनोद भंडारे** यांनी चांगल्या प्रकारे केले आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड

